Page No.:
Date:




1

# शब्दफुले

निर्मिली सुंदर सुमने उमलता
शब्दफुलांना वेचित राहीलो
गंध फुलांचे मज वेड लागला
शब्दसुगंधाला पेरीत राहीलो ---
भावफुलांचा हा दरवळ सुंदर
चराचरात मी उधळू लागलो
शब्दभावनांना, उधाण येता
मीही अंतरी, मोहरूनी गेलो ---
शब्ददान, ते त्या दयाघनाचे
ओंजळीत मीच झेलू लागलो
सरस्वतीची ती कृपा आगळी
शब्दाशब्दांसंगे, डुलू लागलो ---
शब्दभावनांचा स्पर्श लाघवी
भावशब्दार्थी, उमजु लागलो
शब्दशब्दातील त्या जाणिवा
हृदयांतरी नित्य जपत राहीलो ---



भावकवी
श्री. बि.ग. सातपुते

चित्र : श्री. प्रकाश देशपांडे